


दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २०१
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, सोमवार, दि.०३ मार्च २०२५

# पुण्याच्या पाण्याबाबत जलसंपदा मंत्र्यांचं मोठं वक्तव्य !

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.०२, पुणे :** थकबाकी न भरल्याने पुण्याचे पाणी बंद करण्याचा इशारा देणारे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांनी एक पाऊल मागे घेतले आहे. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण क्षेत्रात पुरेसा पाणीसाठा असल्याने शहराला यंदा मुबलक पाणी मिळणार आहे. दर वर्षीप्रमाणे यंदाही २१ दशलक्ष घनमीटर (टीएमसी) पाणी कोटा कायम ठेवण्याचा निर्णय कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आल्याने सध्या तरी पाण्याची चिंता मिटली आहे.



महापालिका वापर करत असलेल्या अतिरिक्त पाण्याबाबत पुढील आठवड्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत जलसंपदा विभाग आणि महापालिका अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात येणार असल्याचे राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितले.

पुणे शहर, तसेच ग्रामीण भागातील शेतीला दिल्या जाणाऱ्या पाण्याच्या कोट्याबाबत चर्चा करण्यासाठी शनिवारी कालवा सल्लागार समिती जादाचे ७.९५ टीएमसी; तसेच भामा आसखेड धरणातून एक टीएमसी आणि पवना धरणातून ०.६० टीएमसी पाणीदेखील देण्याचे बैठकीत निश्चित करण्यात आले. त्यानुसार सुमारे २१ टीएमसी पाणी महापालिकेला मिळणार आहे.

दरम्यान, महापालिका वापरत असलेले अतिरिक्त पाणी आणि त्यापोटी असलेली थकबाकी या संदर्भात मार्चअखेर महापालिकेने २०० कोटी रुपये जलसंपदा खात्याकडे जमा करावेत, अशी सूचना करण्यात आल्याचे विखे पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. ते म्हणाले, शहर वाढत असल्याने लोकसंख्या वाढत आहे. हे लक्षात घेता शहराला अतिरिक्त पाणी द्यावे लागणार आहे. मात्र, शहराला करण्यात येत असलेला पाणीपुरवठा व त्यावर करण्यात येणारी प्रक्रिया यात विसंगती असल्याने त्यावर निर्णय होणे गरजेचे आहे.

महापालिका पाण्याचा जास्त वापर करत असून, या संदर्भात निर्णय घेण्यासाठी शहरातील सर्व आमदार, तसेच दोन्ही विभागांचे अधिकारी यांची एकत्रित बैठक घेतली जाणार आहे. शहरासह ग्रामीण भागालादेखील पाणी पुरवणे जलसंपदा विभागाचे काम आहे. महापालिका अतिरिक्त पाणी वापर करत असल्यास त्याचा परिणाम ग्रामीण भागातील पाण्यावर होऊ शकतो. शेतकरी या संदर्भात कायदेशीर लढा देऊ शकतात. त्यामुळे त्यातून तोडगा काढण्याची गरज आहे.

**अजित पवारांचे मौन !**

पुणे महापालिकेकडे असलेल्या पाणीपट्टीच्या थकबाकीबाबत जलसंपदा विभागाने महापालिकेला नोटीस बजाविली होती. थकबाकी न भरल्यास २५ फेब्रुवारीपासून पाणी बंद करण्याचा इशारा जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिला होता. त्यावरून भाजपच्याच शहरातील लोकप्रतिनिधींनी विखे पाटील यांच्याविषयी नाराजी व्यक्त केली होती. कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत मात्र विखे पाटील यांनी पुण्याविषयी नमती भूमिका घेतल्याचे दिसून आले. पालकमंत्री अजित पवार यांनी कोणतीही उघड भूमिका न घेता मौन पाळले. त्यांनी या प्रश्नाबाबत प्रसारमाध्यमांशी बोलण्याचे टाळले.

## थोडक्यात

### पाळण्यातच चिमुरडीचा गळा आवळला...

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.०२, मुंबई :** तिसरे अपत्य नको म्हणून चार महिन्यांच्या मुलीचा पाळण्यातच गळा आवळून ठार मारणाऱ्या ४० वर्षीय पित्याला शनिवारी पंतनगर पोलिसांनी अटक केली. घाटकोपर पूर्व येथे ही घडना घडली. याप्रकरणी पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला असून आरोपी सध्या पोलीस कोठडीत आहे. संजय बाबू कोकरे (४०) असे अटक आरोपीचे नाव आहे. तो घाटकोपर पूर्व येथे कामराज नगर परिसरातील भैरव नगर विद्यालयाच्या समोरील गल्ली क्रमांक १० येथे कुटुंबियांसोबत राहात होता. संजयची पत्नी शैला कोकरे (३६) यांच्या तक्रारीवरून याप्रकरणी पंतनगर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) अंतर्गत हत्येचा गुन्हा दाखल केला असून याप्रकरणी संजयला अटक करण्यात आल्याची माहिती पोलिसांना दिली. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोकरे दाम्पत्याला दोन मुले आहेत.

चार महिन्यांपूर्वी शैला यांनी मुलीला जन्म दिला होता. तिचे नाव श्रेया ठेवण्यात आले होते. पण संजयला तिसरे अपत्य नको होते. त्यातून पती-पत्नीमध्ये वाद झाले होते. शैलाने शुक्रवारी रात्री श्रेयाला पाळण्यात झोपवले. शैलाने सकाळी पाहिले असता श्रेया हालचाल करत नव्हती. अखेर तिला तातडीने घाटकोपर येथील राजावाडी रुग्णालयात नेले असता तेथील डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. याप्रकरणी अपमृत्यूची नोंद करण्यात आली. त्यावेळी वैद्यकीय तपासणीत श्रेयाचा गळा आवळून तिला मारण्यात आल्याचे समजले. अखेर याबाबतची पोलिसांना माहिती मिळाली असता त्यांनी शैला यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला.

### ठाण्यात ठाकरे आणि शिंदे गटात राडा

**दि.०२, ठाणे :** ठाण्यात कार्यकर्ते मेळाव्याचे आयोजन शिवसेना ठाकरे गटाकडून करण्यात आले होते. या मेळाव्यापूर्वी आनंद आश्रमाबाहेर शिंदे आणि ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये राडा झाला. दोन्ही गटाच्या कार्यकर्त्यांनी एकमेकांविरोधात घोषणाबाजी दिली. तसेच अंगावर धावून जाण्याचा प्रयत्न केला. आनंद आश्रमजवळ अशी घटना घडणार असल्याचा अंदाज बांधला जात होता. परंतु पोलीस बंदोबस्त असतानाही या प्रकारामुळे शहरातील कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गद्दारांकडून स्वागताची अशीच अपेक्षा होती असा टोला खासदार संजय राऊत यांनी लगावला. विधानसभा निवडणुकीनंतर शिवसेना ठाकरे गटातील अनेक महत्त्वाच्या नेत्यांनी शिंदे गटात प्रवेश करत आहेत. पक्ष बांधणीसाठी ठाकरे गटाने राज्यात कार्यकर्ता सुसंवाद मेळावा घेण्याचा निर्णय घेतला आहे. या मेळाव्याची सुरुवात आज, रविवारपासून ठाण्यात होत आहे. या मेळाव्यास खासदार संजय राऊत यांच्यासह महत्त्वाचे नेते, पदाधिकारी उपस्थित आहेत. ज्या ठाण्यातून शिवसेना फुटली. त्याच ठाण्यातून कार्यकर्ता मेळावा सुरू झाल्याने या मेळाव्याकडे राज्याचे लक्ष लागून आहे. या मेळाव्यास ठाकरे गटाचे नेते संजय राऊत, विनायक राऊत, राजन विचारे, भास्कर जाधव, अंबादास दानवे, चंद्रकांत खैरे, सुनील प्रभू उपस्थित होते.

# अहिल्यानगर जिल्ह्यासाठी नव्या बसेस द्या ! खा.निलेश लंके

**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.०२, अहिल्यानगर :** राज्य परिवहन महामंडळाच्या जिल्ह्यातील विविध आगारांकडे असलेल्या बसेसची संख्या कमी असून अनेक बसेस जुन्या झाल्याने मार्गामध्ये बंद पडण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. प्रवाशांची वाढती संख्या पाहता नगर जिल्ह्यातील सर्व आगारांना नव्या बसेस उपलब्ध करून देण्याची मागणी खा. नीलेश लंके यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे केली आहे. मंत्री सरनाईक यांना पाठविलेल्या निवेदनात खासदार नीलेश लंके यांनी नमुद केले आहे की, राज्य परिवहन महामंडळाकडून प्रवाशांना विविध सवलती जाहीर केल्यामुळे मागील वर्षीच्या तुलनेत अहिल्यानगर जिल्ह्यात प्रवासी संख्येत वाढ झाल्याचे दिसून येत आहे. वाढत्या



प्रवासी संख्येच्या तुलनेत जिल्ह्यात सध्या सर्व आगारांच्या मिळून सुमारे ६०० बसेस आहेत. गेल्या तीन वर्षामध्ये बसेसची संख्या खूप कमी झालेली आहे. तसेच बसेस जुन्या असल्यामुळे मार्गामध्ये बंद पडतात. काही बसेस स्क्रॅप करण्यात आलेल्या असल्याचे खा. लंके यांनी नमूद केले आहे.

**सर्व आगारांना जास्तीत जास्त बसेस मिळाव्यात** राज्य परिवहन महामंडळाने राज्यातील इतर जिल्ह्यातील काही आगारांना बसेस दिल्याची माहिती आहे. परंतू अहिल्यानगर जिल्ह्यातील तारकपुर आगाराला १० व संगमनेर आगाराला ९ अशा १९ बसेस देण्यात आल्याचीही माहिती आहे. इतर आगारांना मात्र बसेस मिळालेल्या नाहीत. म्हणून इतर सर्व आगारांनाही जास्तीत जास्त बसेस मिळाव्यात अशी मागणी खा. लंके यांनी केली आहे.

**ग्रामीण विद्यार्थ्यांचे हाल !**

बसेसच्या अपुऱ्या संख्येमुळे खेडया-पाडयात जाणाऱ्या बसेसच्या फेऱ्या कमी झाल्याने ग्रामीण भागातून शहरी भागाकडे जाणा-या विशेषतः विद्यार्थी, विद्यार्थिनींचे हाल होत असल्याचे जाणवत असल्याचे खा. लंके यांनी निवेदनात नमुद केले आहे.

# पुणे पोलिसांकडून अचानक नाकाबंदी तीन हजार वाहनचालकांची तपासणी

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.०२, पुणे :** शहरातील गुन्हेगारी घटना, तसेच बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यासाठी पोलिसांनी शनिवारी अचानक नाकाबंदी केली. नाकाबंदीत तीन हजार वाहनचालकांची तपासणी करण्यात आली. नियमभंग करणाऱ्या ५१४ वाहनचालकांविरुद्ध कारवाई करुन त्यांच्याकडून सात लाख ४६ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. पोलिसांनी या कारवाईत ७२ वाहने जप्त केली.



शहर परिसरातील गुन्हेगारी घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी शनिवारी रात्री अचानक वेगवेगळ्या भागात नाकाबंदी केली. पोलिसांनी दोन हजार ८५३ वाहनचालकांची तपासणी केली. विरुद्ध दिशेने वाहन चालविणे, मोटार चालविताना आसनपट्टा न लावणे, तसेच ट्रिपल सीट जाणाऱ्या दुचाकीस्वारांविरुद्ध कारवाई करण्यात आली. शनिवारी रात्री दहा ते बारापर्यंत प्रमुख रस्ते, तसेच चौकात पोलिसांनी नाकाबंदी करुन वाहनचालकांची तपासणी केली. या कारवाईत पोलिसांनी वाहतूक नियमभंग करणाऱ्या ५१४ वाहनचालकांविरुद्ध कारवाई करुन त्यांच्याकडून सात लाख ४६ हजार रुपयांचा दंड वसूल केला, तसेच ७२ वाहने जप्त केली. पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त पोलीस आयुक्त, उपायुक्त, सहायक आयुक्त, पोलीस निरीक्षक, तसेच १८७२ पोलीस कर्मचारी नाकाबंदी कारवाईत सहभागी झाले होते. यापुढील काळात शहरात अचानक नाकाबंदी करुन वाहनचालकांची तपासणी करण्यात येणार असून, वाहनचालकांनी नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ठाणे मनपा विकास आराखड्याच्या विरोधात कळव्यात आंदोलन

**अक्षराज : संजय पंडित**
**दि.०२, कळवा (ठाणे) :** ठाणे महापालिकेने नवीन प्रारुप विकास आराखडा तयार केला आहे. हा विकास आराखडा विशिष्ट हेतू समोर ठेवून करण्यात आला असल्याचा आरोप करीत राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार गटाचे राष्ट्रीय सरचिटणीस जितेंद्र आव्हाड यांच्या नेतृत्वाखाली हजारोंच्या संख्येने कळव्यातील नागरिक एकवटले आहेत. या विकास आराखड्याला विरोध करण्यासाठी कळवा नाका येथे नागरिकांनी ठाणे मनपा विरोधात जोरदार आंदोलन केलं आहे.

ठाणे मनपाने नवीन विकास आराखडा तयार केला आहे. या आराखड्यानुसार संपूर्ण कळवा – खारीगांव उद्ध्वस्त होणार आहे असा आरोप स्थानिकांनी केला आहे. आराखडे मंजूर असलेल्या सोसायट्यांमधून अवाढव्य रस्ते तयार करून साडेतीनशे ते चारशे इमारतींवर वरवंटा फिरणार असल्याचं म्हटलं जात आहे. त्यामुळे ४५ हजार रहिवाशी बेघर होणार आहेत. त्याविरोधात जनआंदोलन उभारण्यात येणार असून त्याअनुषंगाने कळवे करांनी कळवा नाका येथे एकत्र येत नव्या विकास आराखड्या विरोधात



रणशिंग फुंकले आहे.

यावेळी प्रारुप विकास आराखड्यात कळवा आणि खारीगांव भागातील तब्बल ४०० च्या आसपास इमारती बाधीत होणार आहेत. गावठाण भागी उद्ध्वस्त होणार आहे. कळवा खाडी पुलापुढील भागात असलेल्या तीन इमारती या पूर्णपणे उद्ध्वस्त होऊन येथील रहिवाशी बेघर होणार आहेत. साधारणपणे ४५ हजारांच्या आसपास कुटुंबे थेट रस्त्यावर येणार आहेत. येथील मंदिरे, मैदाने, बाधीत होत असल्याचेही आव्हाड यांनी सांगितले.

कळवा- खारीगांव येथील रहिवाशांना मारुन असा विकास होणार असेल तर त्याला आमचा विरोध आहे. त्यामुळे अशा विकास प्रस्तावाच्या विरोधात आता सर्वपक्षीय एकत्र येऊन आंदोलन उभे केले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. मागील अधिवेशनात मुख्यमंत्र्यांकडून या डी.पी. प्लानबाबत आश्वासन दिले आहे. उद्यापासून सुरू होणाऱ्या अधिवेशनात आपण याबाबत सरकारला जाब विचारणार आहोत, असेही आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले.

यावेळेस राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष सुहास देसाई, विरोधीपक्ष नेते मिलींद पाटील, कार्याध्यक्ष प्रकाश पाटील, विरोधीपक्ष नेत्या प्रमिला केणी, माजी नगरसेवक महेश साळवी, अपर्णा साळवी आदी मंडळी उपस्थित होते.

# आवक वाढल्याने लसूण, फ्लॉवर, कोबी, शेवग्याच्या दरात घट

**दि.०२, पुणे :** आवक वाढल्याने लसूण, फ्लॉवर, कोबी, शेवग्याच्या दरात १० ते १५ टक्क्यांनी घट झाली. अन्य फळभाज्यांची स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी राज्य, तसेच परराज्यातून मिळून ९० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेशातून मिळून ७ ते ८ टेम्पो हिरवी मिरची, कर्नाटक, गुजरातमधून मिळून ३ ते ४ टेम्पो कोबी, कर्नाटक आणि गुजरातमधून मिळून प्रत्येकी ३ ते ४ टेम्पो घेवडा, आंध्र प्रदेश, तमिळनाडूतून मिळून ५ ते ६ टेम्पो शेवगा, राजस्थानातून ७ ते ८ टेम्पो गाजर, तसेच ८ ते १० ट्रक मटार, गुजरात, मध्य प्रदेशातून १० ते १२ टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाली, अशी माहिती मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली. पुणे विभागातून सातारी आले ५०० ते ६०० गोणी, भेंडी ८ ते १० टेम्पो, गवार ४ ते ५ टेम्पो, टोमॅटो ८ ते १० हजार पेटी, हिरवी मिरची ३ ते ४ टेम्पो, ढोबळी मिरची १० ते १२ टेम्पो, काकडी ७ ते ८ टेम्पो, कोबी ८ ते १० टेम्पो, फ्लॉवर १० ते १२ टेम्पो, तांबडा भोपळा १० ते १२ टेम्पो, कांदा ८० ते ९० ट्रक, तसेच इंदूर, आग्रा, स्थानिक भागातून ४० टेम्पो बटाट्याची आवक झाली.

**मेथी, कोथिंबिर, कांदापात, मुळे, पालकच्या दरात वाढ**

मेथी, कोथिंबिर, कांदापात, मुळे ,पालक या पालेभाज्यांच्या दरात वाढ झाली. अन्य पालेभाज्यांचे दर स्थिर आहेत. तरकारी विभागात कोथिंबिर ९० हजार जुडी, मेथीच्या ५० हजार जुडींची आवक झाली., अशी माहिती तरकारी विभागातील व्यापाऱ्यांनी दिली. घाऊक बाजारात पालेभाज्यांचे शेकड्याचे दर पुढीलप्रमाणे – कोथिंबिर- ८०० ते १५००, मेथी – ८०० ते १२००, शेपू – ६०० ते १२००, कांदापात- ६०० ते १०००, चाकवत – ३०० ते ६००, करडई- ३०० ते ६००, पुदिना – ३०० ते ६००

# संपादकीय



## मायकल बुरावे...

जागतिक वैचारिक नेते म्हणून मायकल बुरावे जगातील लक्षावधी सामाजिक शास्त्रज्ञांच्या मनात कायमचे राहतील, यात शंका नाही. ३ फेब्रुवारीला लॉस एंजेलिसमध्ये त्यांच्या झालेल्या अपघाती निधनाने आंतरराष्ट्रीय समाजशास्त्र संघटनेचे हजारो सदस्य, आफ्रिका आणि अमेरिकेतले त्यांचे सहकारी, विद्यार्थी आणि त्यांचे जगभरातले वाचक-चाहते सर्व सुन्न झाले आहेत.

कितीही नकारात्मक परिस्थिती असली, तरी प्राध्यापक बुरावे पुढाकार घेऊन समता आणि न्यायासाठी झटत राहिले. युक्रेनवरील हल्ला असो, गाझातील अमेरिका-इस्रायल पुरस्कृत अमानवी हत्याकांडे असोत वा न संपणारा वंशवाद- त्यांचा ते न थकता निषेध करत राहिले. विद्यापीठीय व्यवस्थेतील आणि त्याबाहेरच्या जगातील विषमता आणि अन्यायाला त्यांनी कृतीतून विरोध केला. त्यांना भेटलेल्या प्रत्येकाला त्यांच्या लांबलचक पुस्तकांच्या यादीमुळे आलेला ताण त्यांचे हसरे, लुकलुकते डोळे आणि मैत्रीपूर्ण चेहरा यामुळे लगेच निघून जाई. अगदी शेवटपर्यंत त्यांच्या लुकलुकत्या डोळ्यातील आशा, 'मला काय करता येईल' हा स्वत:ला विचारलेला प्रश्न आणि या जगात विचारातून आणि व्यासंगातून केलेल्या कृतीतूनच परिवर्तन होऊ शकते, हा त्यांचा ठाम विश्वास कधीही कमी झाला नाही.

ब्रिटनमध्ये जन्मलेले बुरावे केम्ब्रिजमध्ये गणिताची पदवी आणि पुढे झांबियात पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर अमेरिकेत संशोधनासाठी गेले. दुसऱ्या महायुद्धानंतर भांडवलशाही समाजांत औद्योगिक संबंधांमध्ये, श्रम व्यवहारामध्ये विशिष्ट प्रकारचे बदल झपाट्याने दिसून आले. ते कसे झाले, याचा शोध बुरावे यांनी शिकागो शहरातील एका कारखान्यात लेथ मशीन चालवण्याची नोकरी पत्करून, त्या दहा महिन्यांच्या अनुभवांच्या आधारे घेतला. भांडवलशाहीचे स्वरूप बदलले की कामगारांच्या शोषणाचे स्वरूपही बदलते. 'अमेरिकन भांडवलशाहीतील कामगार स्वत:च्या शोषणात सहभागी असतो,' हे त्यांनी दाखवून दिले. हे पीएच.डी.चे संशोधन 'मॅन्युफॅक्चरिंग कन्सेंट' या पुस्तकात प्रसिद्ध झाले.

त्या पुढच्या काळात झांबियातील तांब्याच्या खाणीतील सामान्य कामगार म्हणून आणि नंतर भट्टीवर काम करणारा कामगार म्हणून इतर कामगारांसोबत मिसळून नोकरी करत केलेले त्यांचे संशोधन अनेक ग्रंथांमधून, संशोधनपर लेखांतून, शेकडो व्याख्यानांमधून जगासमोर येत राहिले.

जगातल्या विविध देशांत खाण कामगारांत, कारखान्यातील कामगारांमध्ये मिसळून केलेल्या धारदार समाजशास्त्रीय निरीक्षणांवर आधारित अशी त्यांची कामगार वर्गाच्या जगण्याविषयी, कामाविषयी, श्रम व्यवहाराविषयीची अनेक पुस्तके अतिशय गाजली. आपला सूक्ष्मदर्शक कामगारांवर रोखून धरतानाच त्या कामगारांच्या श्रम व्यवहारांवर, सामाजिक नातेसंबंधांमध्ये कोणते बदल होतात, शोषणातून आलेली असहाय्यता आणि त्याच वेळी गरीब शोषित कामगारांतली निडरता या सगळ्याचा बोलका वेध त्यांनी सातत्याने घेतला. अस्सल मार्क्सवादी समाजशास्त्रज्ञाप्रमाणे बुरावे यांनी भांडवलशाहीचे त्या त्या काळातले स्वरूप जसे बदलते, तसे श्रम व्यवहाराचे, कामाचे, शोषणाचे, नफ्याचे स्वरूप बदलते ते कसे, याचा शोध घेतला. कामगारांच्या दैनंदिन आयुष्यात सहभागी होऊन मक्तेदारी भांडवलशाहीमुळे होणारे आफ्रिकन समाजाचे 'झांबियाकरण' कसे झाले या प्रकारच्या नव्या संकल्पना त्यांनी समाजशास्त्राला दिल्या.

# विद्यार्थी मित्रांनो शिक्षण अर्ध्यावर सोडू नका...

अनेक विचारवंतानी,शिक्षण तज्ञांनी व महामानवांनी शिक्षणाचे महत्त्व वेळोवेळी सांगितले आहे.महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी भारतात स्त्री शिक्षणाचा पाया रचला.भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अनेक वेळा शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले आहे. शिक्षण मानवी जीवनाचा पाया आहे,केवळ शिक्षणामुळेच मनुष्याचा उध्दार होतो,शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो कोणी प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी वारंवार सांगितले आहे.संत गाडगेबाबांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना म्हटले आहे की एकवेळ उपाशी राहा,एक भाकरी ऐवजी अर्धी भाकर खा पण आपल्या मुलांना शिक्षण शिकवा.जर महापुरुष आम्हाला शिक्षणाचे महत्त्व पोटतिडकीने सांगत असतील तर मग आपण शिक्षण शिकलेच पाहिजे.जो अभ्यासक्रम आपण शिक्षणासाठी निवडला तो आपण पूर्ण केलाच पाहिजे.कितीही प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाली तरीही विद्यार्थी मित्रांनो शिक्षण अर्ध्यावर सोडू नका.

आजकाल शिक्षणाच्या बाबतीत असे चित्र दिसते की,आर्थिक परिस्थिती अतिशय नाजूक असणाऱ्या घरची मुले मुली उच्च शिक्षणापर्यंत मजल मारत आहेत आणि चांगली परिस्थिती असणाऱ्या घरची मुले मुली शिक्षणात मागे पडत आहेत. बहुतांश घरचे मुलेमुली केवळ वाईट सवयी आणि मोबाईलमुळे शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर पडत आहेत.बरेच विद्यार्थी तर अभ्यास करत नाहीत.अभ्यासक्रमाची पुस्तके वाचत नाहीत.अवांतर वाचन तर फार दूरची गोष्ट झाली आहे.शाळेत व कॉलेजात जाऊन शिक्षण एकाग्रतेने शिकत नाहीत. व्यसनी मित्रांची संगत व वाईट सवयींमुळे मुले मुली उच्च शिक्षणापासून दूर लोटली जात आहेत.ही फार मोठी चिंतेची बाब झाली आहे.श्रीमंत घरची मुले कसेही आपले शिक्षण पूर्ण करतात परंतु गरीबांची व मध्यम वर्गियांची मुले मुली केवळ पुरेसा पैसा मिळत नसल्याने शिक्षण पूर्ण करत नाहीत.दहावी बारावी पर्यंत कसेबसे शिक्षण शिकल्यानंतर त्या पुढील उच्च शिक्षणाची आवड लुप्त पावत आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी जीवनात अठरा अठरा तास अभ्यास करायचे. त्यांचे वडील रामजी सुभेदार बाबासाहेबांना नवीन पुस्तके वाचनासाठी आणून देत असत.म्हणूनच आज सारे जग बाबासाहेबांना सिंबॉल ऑफ नॉलेज म्हणून ओळखते.आज या घडीला असे अनेक उदाहरणे आहेत की,आईवडील अशिक्षित असले तरीही त्यांची मुले उच्च शिक्षण शिकून आपल्या आईवडिलांच्या कष्टांचे पांग फेडतात. गुणवत्तापूर्ण घेतलेले शिक्षण कधीच वाया जात नाही. आणि कॉपी करून व लबाडीने घेतलेले



शिक्षण उपयोगाला येत नाही.म्हणून विद्यार्थी मित्रांनो,जे शिक्षण तुम्ही शिकणार आहात ते एकाग्रतेने शिका.शिक्षणात टंगळमंगळ करू नका. शिक्षणाला कधीच कमी समजू नका.अर्ध्यावर शिक्षणाचा डाव सोडून देऊ नका.

साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे दीड दिवस शाळा शिकले पण नंतर सामाजिक व साहित्यिक शाळेत त्यांनी उच्च कोटीची प्रतिभा मिळवली. त्याकाळात सातवी उत्तीर्ण झाल्यावर शंकरराव खरातांना सरकारी नोकरीची संधी होती पण त्यांनी उच्च शिक्षणासाठी जीवाचा आटापिटा केला. सगळे गावकरी व नातलग त्यांना नावे ठेवत परंतु उच्च शिक्षणाचा वसा त्यांनी खाली टाकला नाही. डॉ.नरेंद्र जाधव यांच्या वडिलांनी शिक्षणाबाबत प्रेरणादायी संदेश आपल्या मुलांना नेहमी दिला आहे.जे शिक्षण तुम्ही शिकणार आहात त्यात तुम्ही नेहमी टॉपलाच राहाल असे शिक्षण शिकलेच पाहिजे.आणि हे अगदी खरे आहे.

शिक्षणाने नोकरी मिळेलच असे काही नसते परंतु शिक्षण कधीच वाया जात नाही.व्यावसायिक शिक्षणाचे धडे घेतले की कमी भांडवलातही एखादा लघुउद्योग सुरू करता येतो.फक्त तो व्यवसाय करण्याची जिद्द व धमक आपल्या अंगी असली पाहिजे.

पुणे येथील माझे मित्र व सुहृदयी व्यक्ती विजय साळवी यांना आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण अर्धवट सोडून द्यावे लागले होते. पण नंतर त्यांनी फार जिद्दीने उच्च शिक्षण पूर्ण केले.जीवन एक संघर्ष है हे लक्षात ठेवून आज ते समाधानी जीवन जगत आहेत. त्यांचा आदर्श कोणीही घेण्यासारखा आहे.खरंच जीवनात काही बनायचे असेल तर शिक्षण अर्ध्यावर सोडू नका.शिक्षणाचे महत्त्व ओळखून ते पूर्ण करा. शिक्षणाशिवाय गत्यंतर नाही हे नेहमी लक्षात ठेवा.

**- बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट,ता.अहमदपूर**
**जि.लातूर.मो.९५४५४४२६४८.**

# आर्थिक सक्षमीकरणातून लाडक्या बहिणींची झेप उद्योजकतेकडे - मंत्री आदिती तटकरे

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०१, मुंबई :** आर्थिक साक्षरतेकडून आर्थिक सक्षमीकरणाकडे महिलांचा प्रवास सुरू असून या प्रवासात झेप फाउंडेशनचे मोलाचे सहकार्य आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून मिळणाऱ्या निधीतून बचतगटाच्या माध्यमातून महिला उद्योजकतेकडे वळत आहेत. लाडक्या बहिणी लाडक्या उद्योजिका बनत असल्याचे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

झेप फाउंडेशनच्यावतीने विकसित भारत महिला उद्योजिका २०२५ च्या संमेलनाचे आयोजन वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे करण्यात आले. यावेळी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या लाभार्थी, महिला बचत गटाच्या माध्यमातून उद्योग करणाऱ्या महिलांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाच्या सहव्यवस्थापकीय संचालक फरोग मुकादम, उपायुक्त डॉ.प्राची जांभेकर, नगरसेविका हर्षिता नार्वेकर, वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या कार्यकारी संचालक रूपा नाईक, 'झेप'च्या संचालिका पौर्णिमा शिरीषकर यांच्यासह बचत गटाच्या महिला आणि समाज कल्याण विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, जागतिक महिला दिन हा स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव करून देणारा आहे. यानिमित्त झेप फाउंडेशनने ५०० पेक्षा जास्त बचत गटाच्या महिलांना एकत्रित केले आहे. दोन कोटीपेक्षा जास्त महिला लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी आहेत. ग्रामीण भागातील महिलेच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी या योजनेचा लाभ महत्वपूर्ण ठरत आहे. या योजनेच्या माध्यमातून कोट्यवधी महिलांचा आपण आधार होऊ शकतो याचे समाधान लाभले असल्याचे त्यांनी सांगितले.

झेप फाउंडेशनने अशा महिलांना एकत्रित करून त्यांना लघु उद्योगासाठी प्रोत्साहन दिले. महिलांचा सन्मान करताना आम्हाला आनंद होत असल्याचे तटकरे यांनी सांगितले. महिलांचेही कुटुंबातील योगदान वाढावे यासाठी हा प्रयत्न आहे. गरजू महिलांना सहकार्य करण्यासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचेही तटकरे यांनी यावेळी सांगितले.

ज्या महिला शासनाच्या या प्रयत्नांना साथ देत आहेत, चौकटी आणि रूढी परंपरातून बाहेर पडण्यासाठी प्रयत्न करीत आहेत त्यांना आणि ज्या भगिनी त्यांना यासाठी सहकार्य करीत आहेत अशा सर्वांना महिलादिनाच्या शुभेच्छा महिला व बालविकास मंत्री तटकरे यांनी यावेळी दिल्या.

प्रधान सचिव अश्विनी भिडे म्हणाल्या की, जिद्द आणि महत्वाकांक्षा असेल तर महिलाही आपले ध्येय गाठू शकतात. लघु उद्योगात ७० टक्के महिला कार्यरत आहेत. राज्य शासन आणि केंद्र शासन यांच्या विविध योजनांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांनाही उद्यमशील बनवू शकतो. महिलांसाठी आकाश मोकळे आहे त्यांच्या पंखांना बळ देण्याचे काम राज्य शासन करीत असून केवळ महिलांच्या महत्वाकांक्षा आणि जिद्दीने हे साध्य होणार असल्याचे श्रीमती भिडे यांनी यावेळी सांगत महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## काळे कोळसे..

व्हीआयपी ट्रीटमेंट
तुरुंगात कशी मिळे
पहातेचं ओळखीचे
टोचू लागलेत खिळे

जेलच्याआंत बाहेर
कोळसे सर्वत्रकाळे
हुकूमांचे रे ताबेदार
आदेश वरला पाळे

आम्हाही भितीअसे
खणतीलं पाळे मुळे
कसा वृक्ष तोडणारं
दूरवरी रूजली मुळे

तुम्हा तेंव्हा सांभाळे
उगाचं कशांला जळे
विसरलात जेलवारी
अक्कल का पाजळे

सर्व पक्षीय अडकले
विणून स्वताचं जाळे
पहा जुनी समीकरणे
सर्वांची गणिते जुळे

कधी हे तर कधी ते
सर्वांचेसारखेचंचाळे
जेलवास्तव्य आठव
उगाकरतात कुचाळे

इतिहासांत डोकवता
जखमजुनी भळभळे
जेलभिंतीची ओळख
उथळ सारे खळखळे

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# जागतिक वन्यजीव दिन...



आज ३ मार्च, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक वन्यजीव दिन म्हणून साजरा केला जातो. वन्यजीवांची शिकार थांबवून वन्यजीव प्रजातींचे संवर्धन करणे हा या दिना मागिल मुख्य उद्देश आहे. १९७० च्या सुमाराला वन्यजीवांची शिकार, त्यांची तस्करी याचे प्रमाण वाढू लागले होते. हे प्रमाण इतके वाढले की त्यापैकी बरेचसे वन्यजीव कायमचे नष्ट होतात की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. याबाबत जागृती करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने ( युनो ) वन्यजीव दिवस साजरा करण्याचे ठरवले. यादिवशी वन्यजीवांचे रक्षण त्यांचे संवर्धन आणि निसर्ग साखळीतील त्यांचे महत्व आदी विषयांवर जनजागृतीचे कार्यक्रम केले जातात. नामशेष होण्याच्या धोका असलेल्या वन्य सृष्टीच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर बंधन आणणारा कायदा ३ मार्च १९७३ रोजी ८० देशांनी मान्य केला म्हणून या दिवसाला महत्व आहे.

वन्यजीवांची शिकार तसेच त्यांच्या आणि दुर्मिळ वनस्पतींचा चोरटा व्यापार ही मोठी समस्या बनली आहे. केवळ भारतातच नाही तर जगभरात ही मोठी समस्या बनली आहे. एककिडे जंगले कमी होत आहे तर दुसरीकडे शिकार आणि तस्करीमुळे वन्यजीव नामशेष होत आहे. निसर्गाच्या समृद्ध परंपरेचा केंद्रबिंदू म्हणजे वन्यजीव. बंगालचे वाघ, आशियातील एकशिंगी गेंडे, भारतीय मोर आणि अशा इतर वैशिष्ट्यपूर्ण वन्यजीवांचे सुरक्षित वसतिस्थान म्हणजे जंगल. पण आता याच जंगलावर मानवाने अतिक्रमण केल्याने या वन्यजीवांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. हत्ती, गेंडा आणि वाघ हे जंगलातील मुख्य वन्यजीव आहेत. निसर्ग साखळीत या वन्यजीवांचे महत्व अनन्यसाधारण आहे पण हस्तिदंत, गेंड्याचे शिंग आणि वाघाच्या शरीरातील विविध अवयव यांच्या चोरट्या व्यापाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. जगभरात या व्यापारातून दरवर्षी ३५ हजार ते ७० हजार कोटी रुपयांची उलाढाल होत असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. गेल्या ४० वर्षात जगभरातील अर्धे वन्यजीवन धोक्यात आले आहे. वन्यजीवांचा अधिवास धोक्यात येणे, वन्यजीवांची शिकार त्यांची तस्करी अशा अनेक कारणाने वन्यजीवांची संख्या कमालीची घटली आहे. हस्तिदंतासाठी आजवर १ लाख आफ्रिकन हत्ती शिकार झाले आहेत. खवले मांजर हा जगातील सर्वाधिक मारला जाणारा सस्तन प्राणी ठरला आहे. मागील दहा वर्षात गेंड्याच्या शिकारीत कैक पटीने वाढ झाली आहे.

वन्यजीवांच्या तस्करीमुळे कायदा आणि सुरक्षा व्यवस्था, गुन्हेगारी टोळ्यांचा निधी यासारखे प्रश्न उपस्थित होऊ लागले आहे. वन्यजीवांची शिकार तसेच त्यांच्या आणि दुर्मिळ वनस्पतींचा चोरटा व्यापार स्थानिकांच्या मदतीशिवाय होणे शक्य नाही. त्यामुळे असे होऊ नये यासाठी त्यांचे प्रबोधन होणे गरजेचे आहे. निसर्गाच्या साखळीतील प्रत्येक घटक किड्यांपासून ते हत्तीपर्यंत पृथ्वीवरील जीवसृष्टीसाठी महत्वाचा आहे. ही बाब सर्वांनी ध्यानात घेतली पाहिजे. जगातील एकूण लोकसंख्येपैकी ३० टक्के लोकसंख्या तरुण आहे. विशेष म्हणजे भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ६० टक्के लोकसंख्या तरुण आहे. म्हणून वन्यजीव संरक्षण व संवर्धन करण्यात तरुणांचा सहभाग अतिशय महत्वाचा आहे. तरुणांना वन आणि वन्यजीवांचे महत्व समजावून सांगावे त्यासाठी शाळा कॉलेजमध्ये जाऊन त्यांचे प्रबोधन करावे. तरुणांच्या हातात त्या त्या देशाचे भविष्यच नसून जगभरातील सर्व वन्यजीवांच भविष्य त्यांच्याच हाती आहे. सरकारनेही वन्यजीवांची शिकार करणारे व त्यांची तस्करी करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी. जंगलतोड होऊ नये यासाठी उपाय योजावेत. वन्यजीवांचे संरक्षण करणे ही आपली जबाबदारी नसून कर्तव्य आहे.

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## लासलगाव येथील दत्त मंदिरात केली द्राक्षांची आरास



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०२, विंचूर (नाशिक) :** आशिया खंडातील एक नंबरची बाजारपेठ लासलगाव, नावाजलेली कांदा नगरी म्हणून प्रसिद्ध असलेली ह्या लासलगाव नगरीतील जुने व जागरूत भक्तांची दृढ भक्ती आणि त्यांना पावन होत असलेले जागृत देवस्थान म्हणून लासलगाव येथील दत्त मंदिर भक्तांनी विशेष करून रविवार, दिनांक ०२ फेब्रुवारी २०२५ रोजी द्राक्षांनी मंदिरात सजावट केली. लासलगाव येथील या दत्त मंदिरात वर्षभरातील प्रत्येक पौर्णिमा उत्सव, दत्त जयंती उत्सव, सप्ताह उत्साहात अशा विशेष कार्यक्रमादिनी भक्त मंडळी वेगवेगळे आरास करत असतात. त्यात आज या मंदिरात द्राक्षांची सजावट केली. हे एक विशेष पारंपारिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. साधारण २०० किलो द्राक्षांच्या घडांनी आरास केला होता. या सजावट कार्यक्रमाचे महत्त्वाचे म्हणजे, दत भक्तांचे श्रद्धास्थानाचे आकर्षण वाढवते. हा कार्यक्रम अद्वितीय आणि आनंददायक अनुभव प्रदान करतो. या कार्यक्रमात भाग घेणारे लोक आपली भक्ती व्यक्त करण्यासाठी एकत्र येतात आणि मनसोक्त आनंद घेतात. लासलगाव पंचक्रोशीतून आरास बघण्यासाठी व श्री दत्तात्रय महाराजांचे दर्शन घेण्यासाठी अलोट गर्दी झाली होती. त्यानंतर भक्ती गीतांचा आणि भजनांचा कार्यक्रम होऊन नंतर प्रसाद वाटप करण्यात आला.

## विद्यार्थ्यांनी केली श्री ढोकेश्वर मंदिर परिसराची स्वच्छता

### ग्रामस्थांमधून उपक्रमाचे कौतुक



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील पुरातन पांडवकालीन धार्मिक व ऐतिहासिक असणाऱ्या टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर मंदिर परिसरात श्री ढोकेश्वर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. महाशिवरात्रीनिमित्त श्री ढोकेश्वर मंदिरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ढोकेश्वराचे दर्शन घेण्यासाठी येणाऱ्या भाविकांना साबुदाणा खिचडीचा महाप्रसाद व फळांचे वाटप करण्यात आले होते. यावेळी मंदिर परिसरात महाप्रसादासठी वापरलेले द्रोण तसेच केळाच्या साली व पाण्याच्या मोकळ्या बाटल्या, पाने, फुले, प्लास्टिक पिशव्या, रिकामे बॉक्स यामुळे सगळीकडे मोठ्या प्रमाणात कचरा साचला होता. दरवर्षी प्रमाणे श्री ढोकेश्वर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी मंदिर परिसरातील संपूर्ण कचरा व कागद जमा करून त्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावली. प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपप्राचार्य विरेंद्र धनशेट्टी, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.नामदेव वाल्हेकर, संकेत ठाणगे, संतोष कोकाटे, श्रीकांत आल्हाट, डॉ.सुदाम विर, डॉ.एकनाथ जाधव, संजय गायकवाड, विद्यार्थी कल्याण मंडळाचे अधिकारी किशोर कांबळे, मदन सोनवणे, सोमनाथ चौधरी, शुभांगी पवार, निशा थोपटे, कोमल तिकोणे, पूजा खोडदे, सुभाष बांडे यांनी ही स्वच्छता मोहीम पार पडली.

श्री ढोकेश्वर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी, विद्यार्थ्यांनी मंदिर परिसरातील ओला कचरा व सुका कचरा असे वर्गीकरण करून त्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावली. स्वच्छ भारत या उपक्रमाला बळकटी देण्यासाठी तसेच महाशिवरात्रीनिमित्त स्वच्छता मोहीम हाती घेऊन यशस्वीपणे पार पडली या उपक्रमाचे टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांकडून कौतुक करण्यात येत आहे.

## मुस्लिमांचा रमजान उपवासाला सुरुवात

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.०२, माथेरान :** रमजान ईद जी इज उल फित्र म्हणून ओळखले जाते. हे मुस्लिम धर्मातील एक पवित्र संबंधात हा सण रमजान महिन्याच्या समाप्तीनंतर साजरा केला जातो. रमजान इस्लामी कॅलेंडर मधील नववा महिना पासून या महिन्यात मुसलमान उपास रोजा ठेवतात. नमाज अदा करतात आणि धार्मिक कार्य करतात. या महिन्यात उपास संपल्यानंतर ईद उत्सव म्हणून साजरा केला जातो हिच्या दिवशी विशेष नमाज अदा केली जाते आणि सर्वांसाठी सुख-समृद्धीची प्रार्थना केली जाते. (सदा ए फित्र) गरिबांना आणि गरजू लोकांना अन्न मदत दिली जाते. तर आपसे प्रेमाने सौहार्द म्हणजे लोक एकमेकांना शुभेच्छा देऊन मिठी मारताना ईद मुबारक म्हणतात. या दिवशी विशेष शीरखुर्मा आणि इतर गोड पदार्थ घरोघरी बनविले जातात. कुटुंबाने मित्रांसोबत आनंद साजरा केला जातो. भेटवस्तू गोड धोड पदार्थांची देवाण-घेवाण केली जाते. ईद हा प्रेम बंधुत्व आणि दानशूर पनाचा संदेश देणारा सण आहे.

## डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी यांच्या वाढदिवसानिमित्त स्वच्छता अभियान

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.०१, माथेरान (रायगड) :** डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा, रायगड, महाराष्ट्र एक सामाजिक संस्था आहे. जी समाजातील आध्यात्मिक आणि सामाजिक सुधारणा करण्यासाठी कार्यरत आहे. या प्रतिष्ठानतर्फे विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. ज्यामध्ये वृक्षारोपण, जल पुनर्भरण, शैक्षणिक साहित्याचे वितरण आणि विशेषतः स्वच्छता अभियानांचा समावेश आहे. मोठ्या प्रमाणात असतो. दिनांक १ मार्च २०२५ डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या वाढदिवसानिमित्त त्याच्या हजारो अनुयायांनी कर्जत, नेरळ, माथेरान या ठिकाणी स्वच्छता अभियान राबवून आपल्या गुरुच्या शिकवणीला योग्य न्याय दिला. या अगोदर ही स्वच्छता अभियानाच्या माध्यमातून प्रतिष्ठानने संपूर्ण महाराष्ट्रभरात स्वच्छता मोहीम राबवल्या आहेत. या अभियानांमुळे पर्यावरणीय प्रदूषणात घट झाली असून नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता वाढली आहे. प्रतिष्ठानच्या या उपक्रमांचे समाजात सकारात्मक परिणाम दिसून येताना दिसत आहे. तसेच प्रतिष्ठानच्या या सततच्या प्रयत्नांमुळे समाजात स्वच्छता आणि पर्यावरण संरक्षणाबद्दल जागरूकता वाढत आहे. ज्यामुळे एक स्वच्छ आणि निरोगी समाज निर्माण होण्यास मदत होणार आहे.

# अहिल्यानगर कल्याण महामार्ग लवकरच सिमेंटचा होणार...

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०२, कल्याण (ठाणे) :** अहिल्यानगर-कल्याण राष्ट्रीय महामार्ग (क्र. ६१) वर मोठा बदल होत असून हा महामार्ग डांबरीकरणा ऐवजी आता सिमेंट काँक्रीटचा होणार आहे. महामार्गाच्या दुसऱ्या टप्प्यातील अहिल्यानगर ते टाकळी ढोकेश्वर-पारनेर तालुका हद्द या ५० किलोमीटर लांबीच्या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. १५५ किलोमीटर लांबीचा हा महामार्ग तीन टप्प्यांमध्ये सिमेंट काँक्रीटने तयार केला जाणार आहे, ज्यासाठी केंद्र सरकारने २५० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

सध्या या महामार्गावर १० मीटरचा दुपदरी डांबरी रस्ता आहे, जो आता सिमेंट काँक्रीटने पुनर्रचित केला जाईल. यामुळे महामार्गावरील वाहतूक अधिक सुरक्षित आणि गुळगुळीत होणार आहे. दुचाकी आणि चारचाकी वाहनधारकांसाठी हा बदल अत्यंत उपयुक्त ठरणार आहे, कारण रस्त्याची गुणवत्ता आणि टिकाऊपणा मोठ्या प्रमाणावर सुधारेल.

या रस्त्याच्या निर्मितीसाठी पुण्याच्या 'टी अँड टी' कंपनीला जबाबदारी देण्यात आली आहे. हा सिमेंट काँक्रीटचा रस्ता अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने उभारला जात आहे. २०० मिमी जाडीसह 'पेव्हमेंट क्वालिटी काँक्रीट' (झटउ) तंत्रज्ञान वापरले जात आहे, जे टिकाऊपणा आणि वाहतुकीची गती सुधारण्यास मदत करेल.ढवळपुरी फाट्यापासून या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी एका बाजूने ५ मीटरचा सिमेंट काँक्रीट रस्ता आधी बांधला जात आहे. सध्याच्या डांबरीकरणावरच पीक्युसी क्राँक्रिटचा थर टाकला जाणार आहे. त्यामुळे नवीन जमीन अधिग्रहण करण्याची गरज भासणार नाही.

**महामार्गाच्या ३ टप्प्यांची संपूर्ण योजना -**

१) पहिला टप्पा :- माळशेज ते मढ (५० किमी)

२) दुसरा टप्पा :- अहिल्यानगर बायपास ते टाकळी ढोकेश्वर मार्गे पारनेर तालुका हद्द (५० किमी)



३) तिसरा टप्पा :- अहिल्यानगर ते खरवंडी मार्गे पाथर्डी (५५ किमी) विशेष बाब म्हणजे या संपूर्ण कामासाठी महामार्गावर कोणतीही टोल वाढ केली जाणार नाही, अशी माहिती संबंधित कंपनीने दिली आहे. रस्त्याच्या दर्जात होणाऱ्या सुधारामुळे कल्याण, अहमदनगर आणि पाथर्डी या ठिकाणी जाणाऱ्या प्रवाशांचा वेळ आणि खर्च वाचणार आहे.

दरम्यान या महामार्गाच्या सिमेंट काँक्रीटीकरणामुळे या मार्गावरील प्रवास अधिक सुरक्षित होणार आहे. महाराष्ट्राच्या वेगाने विकसित होणाऱ्या औद्योगिक वसाहती आणि ग्रामीण भागाला या नवीन सिमेंट महामार्गाचा मोठा फायदा होईल.कल्याण आणि त्या पलीकडील भागात जाण्यासाठी आता वेगवान आणि आरामदायी पर्याय उपलब्ध होणार आहे. सध्याच्या डांबरी रस्त्याच्या तुलनेत सिमेंट काँक्रीटचा महामार्ग अधिक टिकाऊ, सुरक्षित आणि सोयीस्कर ठरणार आहे. ३ टप्प्यांमध्ये सुमारे १५५ किलोमीटरचा हा महामार्ग तयार होईल, जो केंद्र सरकारच्या २५० कोटींच्या निधीतून उभारला जात आहे. त्यामुळे वाहतुकीचा दर्जा सुधारेल आणि वाहनधारकांचा प्रवास जलद व आरामदायी होईल.

# ग्रामपंचायतीचे 'आपलं सरकार' कात टाकणार !

## नवा युजर आयडी; एकाच ठिकाणी शासकीय योजनांचा लाभ

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, अहिल्यानगर :** जिल्ह्यातील १ हजार ३२३ ग्राम पंचायतमधील 'आपलं सरकार' सेवा केंद्र कात टाकणार असून या ठिकाणी पूर्वीपेक्षा अधिक सेवा मिळणार आहेत. यासाठी आता सरकारच्या आदेशानुसार ग्रामपंचायतीच्या नावाने महाआयटीकडून यूजर आयडी मिळणार आहे. या आयडीवरून ग्रामविकासह राज्य सरकारच्या ३८ योजनामधील ९०० हून अधिक सेवांचा लाभ नागरिकांना मिळणार आहे.




पूर्वी महाआयटीचा हा पोर्टल आयडी ग्रामपंचायतींच्या ऑपरेटच्या नावाने मिळत होता. मात्र आता तो ग्रामपंचायतींच्या नावे मिळणार आहे. राज्य सरकारच्या धोरणानुसार यापूर्वी महा-ईसेवा केंद्रातून तसेच सेतू सेंटरमधून नागरिकांना वेगवेगळ्या शासकीय दाखल्यांसह विविध शासकीय सेवा उपलब्ध करून देण्यात येत होत्या. याच धरतीवर आता जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतमार्फत ग्रामविकाससह अन्य शासकीय विभागाच्या योजना आणि दाखले उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यादृष्टीने राज्य सरकार आणि महाआयटी विभागाच्या हालचाली सुरू आहेत.

यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीला महाआयडीकडून स्वतंत्र युजर आयडी देण्यात येणार आहे. ग्रामपंचायतीमध्ये सुरू असणार्या आपलं सेवा केंद्र या नव्या युजर आयडीमार्फत हे काम सुरू राहणार आहे. यापूर्वी ग्रामपंचायतीमध्ये मंजूर असणार्या आपलं सरकार पोर्टलवर जन्म, मृत्यू सह अन्य सात प्रकारचे दाखले देण्यात येत होते. मात्र हे काम आता वाढविण्यात येणार आहे. तसेच खाजगी आपलं सरकार केंद्र आणि सेतू केंद्रामार्फत देण्यात येणार्या ९६९ सेवा आणि विविध दाखल्यांपैकी जवळपास सर्व कामे ही आता ग्रामपंचायतची आपलं सरकार पोर्टल मार्फत करण्यात येणार आहेत.

साधारण पुढील महिन्यापासून ग्रामपंचायतीमध्ये ही सेवा उपलब्ध होणार असून यासाठी ग्रामपंचायतींचे स्वतंत्र युजर आयडी काढण्याचे काम सुरू आहे. जिल्ह्यातील सर्व ग्राम पंचायतीची यादी जिल्हा पातळीवर महाआयटी विभागाला देण्यात आलेली आहे. त्यानुसार ग्रामपंचायतींचे नवीन युजर आयडी काढण्याचे काम सुरू आहे. पुढील ८ दिवसांत याबाबत राज्य स्तरावरील महाआयटीकडून मंजुरी मिळाल्यावर पुढील कार्यवाही होणार आहे. दरम्यान, ग्रामपंचायतींना महाआयटी विभागाकडून नव्याने युजर आयडी मिळणार असल्याने जुन्या ऑपरेटरच्या नावाने दिलेल्या युजर आयडी चे काय करायचे असा प्रश्न असून त्याबाबत निर्णय स्पष्ट नसल्याचे सुत्रांकडून सांगण्यात आले.

# पेण शहरात डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान मार्फत स्वच्छता अभियान

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०२, पेण (रायगड) :** जेष्ठ निरूपणकार, महाराष्ट्र भूषण, तीर्थरूप डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंतीनिमित्त रविवार, दिनांक २ मार्च २०२५ रोजी सकाळी ८:३० वाजता डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडाच्या वतीने देशभरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले होते. त्याचा एक भाग म्हणून पेण शहरात पद्मश्री डॉ. श्री.आप्पासाहेब धर्माधिकारी व सचिन दादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या स्वच्छता अभियानामध्ये तब्बल १०८१ श्री सदस्यांनी स्वच्छता अभियानामध्ये सहभागी झाले होते. त्याच्यावतीने शहरात पेण शहरात ICE फॅक्टरी, कवडाल तलाव आणि परिसर, मुख्य बाजारपेठ, पेण एसटी स्टँड, तहसिल कार्यालय व परिसर, संत गोरा कुंभार चौक व परिसर, म्हाडा कॉलनी, समर्थ वाडी, नंदीमाळ नाका, विश्वेश्वर मंदिर व परिसर, आंबेडकर शाळा, चावडी नाका, उपजिल्हा रुग्णालय, सार्वजनिक बांधकाम विभाग व उपविभाग पेण, श्री संभाजी महाराज चौक, उर्दु शाळा, रेल्वे स्टेशन, प्रात ऑफीस, महाडीक वाडी, कोर्ट परिसर, रामवाडी बस स्थानक, पंचायत समिती ऑफिस, रामवाडी, या भागात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

पेण शहरात स्वच्छता अभियान करता शासकीय अधिकारी, कर्मचारी, तसेच डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे श्री सदस्य, मोठ्या संख्येने



सहभागी झाले होते.

सदर संपूर्ण पेण शहरातील २१ हजार ८९३ किलो मीटरचा परिसर स्वच्छ करण्यात आला. यात जमा करण्यात आलेला ओला कचरा ६ टन ७१७ किलो तर १५ टन २७५ किलो सुका कचरा संकलन करण्यात आले आहे.

सदर अभियानास पेण नगर परिषद मुख्याधिकारी जीवन पाटील, लेखा शाखा विभाग प्रमुख किरण शहा, आरोग्य निरीक्षक दयानंद गावंड, पेण पोलीस उपनिरीक्षक विक्रम नावरखेडे, वनविभागचे वनरक्षक हनुमंत सूर्यवंशी, वनपाल हिरामण ढाकोळ, जानू चौधरी, बालाजी आडे, सचिन मोरे, वनरक्षक सुहास राऊत, शेखर कुवर, राजेश साबळे, अजय मलाव, संजय कदम, वसंत पोईलकर, पूजा डरफे, कावेरी ढगे तसेच श्री सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने जव्हारमध्ये संपुर्ण स्वच्छता अभियान

**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.०२, जव्हार (पालघर) :** महाराष्ट्र भुषण तिर्थ. डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा, ता.अलिबाग यांच्या सौजन्याने तसेच पद्मश्री व महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित ति. डॉ. श्री आप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ. श्री. सचिनदादा धर्माधिकारी यांचे अमूल्य मार्गदर्शनातून जव्हार शहरात स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. जव्हार शहरातील स्वच्छता अभियानात शहरातील मुख्य रस्ता, शासकीय कार्यालया बाहेरील परिसराची स्वच्छता करण्यात आली. यावेळी विक्रमगड विधानसभेचे आमदार हरिश्चन्द्र भोये यांनी देखील सर्व श्री सदस्य व नागरीकांचे समवेत हातात खराटा घेऊन या स्वच्छता अभियानात सहभाग नोंदवत डॉ श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा यांच्या मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध समाजपयोगी कार्यास शुभेच्छा देत, उपस्थितांना स्वच्छता संदर्भात मोलाचे मार्गदर्शन केले. तद्नंतर सर्व श्री सदस्य एकत्र येऊन खराटा, फावडा, कोयते, पंजा, घमेली व इतर साहित्य घेऊन जव्हार शहरातील विजयस्तंभ ते पेट्रोल पंप, गोरवाडी, साकीनाका, जांभूळविहीर आदिवासी भवन, डंपिंग ग्राउंड, जुना राजवाडा, गांधी चौक, बस स्टॉप, डॅम आळी, हनुमान पॉईंट, मुकणे कॉलनी, मांगेलवाडा तसेच प्रकल्प कार्यालय, प्रांत कार्यालय, आय.टी.आय, नगर पालिका, तहसील ऑफिस, पोलीस स्टेशन, पतंगशहा कुटिर रुग्णालय न्यायालय, तलाठी कार्यालय, पंचायत सामिती इ. विविध कार्यालया बाहेरील सर्व परिसराची स्वच्छता केली. महाराष्ट्र भुषण तिर्थ.डॉ श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानाच्या वतीने जव्हार शहरात संपुर्ण स्वच्छता अभियान मोहिम यशस्वी करून या उपक्रमांतर्गत श्री सदस्यांनी सकाळी ७ ते ११:३० या वेळेत जव्हार शहराची स्वच्छता केली. त्यामुळे जव्हार शहरातील नागरीकांनी, व्यापारी यांनी या स्तुत्य उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले. महाराष्ट्र भूषण डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंड़ा यांच्या स्वच्छता अभियान मोहिमेत उपस्थित श्री सदस्यांनी स्वच्छतेचे सर्व नियम पाळून स्वच्छता मोहिमेत जवळ पास ४३३ श्री सदस्यांनी सहभागी झाले होते. स्वच्छता अभियानात जवळपास ७ हजार ५०० चौ.मी. क्षेत्रफळात सफाई करण्यात आली. स्वच्छता करतांना प्रतिष्ठाना मार्फत ०४ ट्रॅक्टर, व नगरपरीषद जव्हार यांचेकडून ०३ कचऱ्याच्या गाड्या, २६४ झाडू, ०२ घमेली, ६९ कोयते, ५३ पंजा, १५ फावडे, १२ विळे, मास्क ५००, हेंडग्लोज ५१० जोडी, इत्यादी साहित्याचा वापर करण्यात आले होते. स्वच्छता अभियानात जव्हार शहरातून १३.५०० टन सुका कचरा व ७.२०० टन ओला कचरा यांची योग्य प्रकारे नियोजन करून विल्हेवाट लावण्यात आली. ट्रॅक्टरच्या ३३ फेऱ्या करण्यात आल्या. यावेळी जव्हार शहरातील नागरीक तसेच नगर परिषद जव्हार यांचे अमूल्य सहकार्य मिळाले.

# यापुढे निकृष्ट कामे खपवून घेणार नाही - आमदार बाबुराव कदम

**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.०२, हदगाव (नांदेड) :** हदगाव नगरपरिषद हद्दीतील विकास कामे अत्यंत निकृष्ट झाली असल्याच्या नागरिकांच्या तक्रारींची दखल घेऊन आमदार बाबुराव कदम यांनी मुख्याधिकारी व अभियंत्यांना गंभीर सूचना केल्या. सदर कामांची योग्य ती चौकशी करून निकृष्ट दर्जाची कामे होणार नाहीत याची दखल घेण्यास सांगितले. आणि निकृष्ट कामांची देयके थांबवून नियमाप्रमाणे काम करून घेतल्यानंतरच देयके देण्यात यावेत व यापुढे निकृष्ट कामे होत असल्याचे निदर्शनास आल्यास खपवून घेतले जाणार नाही अशी ताकीद सुद्धा दिली.हदगाव शहरात अनेक रस्त्याची कामे नाल्यांची कामे अत्यंत निकृष्ट झाले आहेत अशा तक्रारी नागरिकांनी लोकप्रतिनिधी या नात्याने आमदार बाबुराव कदम यांच्याकडे केले आहेत. नागरिकांच्या या तक्रारीची गंभीर दखल घेत आमदार कदम यांनी मुख्याधिकारी यांच्यासोबत याविषयी चर्चा केली. मागील वर्षी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे असताना हदगाव शहरात मोठ्या प्रमाणात विकास कामासाठी निधी आणला. तसेच शासनाच्या नियमित धोरणाप्रमाणे सुद्धा मोठ्या प्रमाणात विकास कामांचा निधी आलेला आहे अनेक कामे मागील दोन वर्षांपासून सुद्धा प्रगतीपथावर आहेत. या कामांचा दर्जा अत्यंत निकृष्ट असून काम पूर्ण होण्याअगोदरच झालेल्या कामाची वाताहात होत आहे. हदगाव हिमायतनगर या दोन्ही तालुक्याप्रमाणेच



हदगांव शहरातील नागरिकांनी देखील मोठ्या अपेक्षेने आमदार बाबुराव कदम यांना प्रचंड मताधिक्याने विजयी केले. नागरिकांनी टाकलेला विश्वास सार्थ ठरवण्याचे आता आमदार बाबुराव कदम यांनी मनावर घेतले असून नागरिकांच्या विश्वासाला तडा न जाऊ देण्यासाठी येणाऱ्या तक्रारींची दखल घेतली आहे. यापूर्वीच्या नेत्यांनी काही विशिष्ट भागातच विकासकामे केली तर काही भागात विकास कामांना डावलले. हदगाव शहराचा समतोल विकास करण्याचा आपला मानस असल्याचे सुद्धा त्यांनी यावेळी जाहीर केले. परंतु आलेला निधी केवळ हडप करण्याचा प्रयत्न कोणी करू नये. याची जबाबदारी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी आणि संबंधित अभियंते यांची असल्यामुळे कोणत्याही काम ातील भ्रष्टाचार अनियमितता किंवा निकृष्टता खपवून घेतली जाणार नाही. मुख्याधिकाऱ्यांच्या निर्देशावरून सुद्धा कंत्राटदारांनी मनमानी चालवल्यास अशा एजन्सीची नावे कळ्या यादीत टाकण्याचे सुद्धा आमदार बाबुराव कदम यांनी मुख्याधिकारी यांना सूचना केली आहे.

# गॅझेट्स माणसासाठी, की माणूस गॅझेट्स साठी?

प्राचीन व मध्ययुगीन काळ हा 'तलवार' धारण करणाऱ्यांचा होता. औद्योगिकरणानंतरचा काळ हा 'तराजू' हातात घेणाऱ्यांचा होता. आजचा काळ हा तंत्रज्ञान डोक्यात घेऊन गॅजेट्सचा सफाईदारपणे वापर करणाऱ्यांचा व नाविन्यता आणणाऱ्यांचा आहे.'गॅझेट्स' म्हणजे अशी यांत्रिक उपकरणे जी माणसाचे श्रम कमी करून त्याच्या उत्पादकतेत वाढ करतात. मनोरंजन करतात. एकमेकांशी संपर्क साधण्यास मदत करतात. आजच्या काळात स्मार्टफोन, टॅब्लेट, लॅपटॉप, स्मार्टवॉच, फिटनेस ट्रॅकर्स, व इतर गृहपयोगी वस्तू यांना आपण गॅझेट्स म्हणून ओळखतो.

गॅझेट्स याचा वापर 'दुधारी' शस्त्राप्रमाणे होऊ शकतो. त्याचाच एक भाग म्हणजे मोबाईल वरून लोकांची आर्थिक फसवणूक झाल्याच्या बातम्या आपण दररोज वाचतो. सोशल मीडियाचा बेसुमार व अमर्याद वापर लोकांचे माथी भडकवण्यासाठी आणि दूषप्रचार करण्यासाठी त्याला जात आहे.अशा परिस्थितीत ' गॅझेट्स माणसासाठी, की माणूस गॅझेट्स साठी आहे ? ' असा प्रश्न मनात निर्माण होतो. गॅझेट्स वाईट आहेत,की ती हाताळणारा माणूस वाईट आहे,हे ठरवणे सोपे आहे. नक्कीच हाताळणारा माणूस वाईट आहे,परंतु त्याला दोष न देता आपण सारे जण गॅझेट्स च्या नावाने उर बडवत आहोत.

मानवी उत्क्रांतीचा इतिहास समजून घेतला, तर असे लक्षात येते की, माणसाने प्रत्येक तंत्रज्ञानाचा



वापर बरा व वाईट अशा दोन्ही प्रकारे केला आहे. आदीम अवस्थेत असताना माणसाला 'गारगोटी व लोखंडाचा अंश असलेला दगड' हे असे साधन मिळाले ज्याच्या घर्षणातून त्याने आग निर्माण केली. त्या अग्नीमधून त्याने आपले अन्न शिजवून रुचकर बनवून खाल्ले. अर्थातच त्याने त्या अग्नीचा उपद्रव इतर मानवांना देखील दिला असेलच. पुढील काळात दगडापासून हत्यारे बनवून 'दगडी हत्यारे' हे एक नवीन साधन त्याने बनवले. तो शिकार करू लागला व त्याचे कष्ट कमी झाले. स्वसंरक्षण, शिकार व त्यातून अन्न असे दुहेरी परिणाम साधणारे हे दगडी हत्यारे नावाचे साधन त्याने इतर मानवांना उपद्रव देण्यासाठी नक्कीच वापरले असेल. चाकाचा शोध लागल्यानंतर चाक या साधनाच्या मदतीने मानवी प्रगतीचा वेग हजारो पटीने वाढला. आज देखील अग्नि, हत्यारे व चाक ही साधने माणूस नवनवीन रूपात वापरत आहे. त्याचा दुरुपयोग देखील करत आहे.

पुढील काळात त्याने अनेक गॅजेट्स निर्माण केले. मोठमोठाली यंत्रे, हत्यारे, विमान, जहाज, छापखाना आणि आधुनिक प्रसार माध्यमे ही मानवी जीवन सुखी, आनंदी आणि सुलभ करणारी गॅजेट्स कधी कधी त्याच्या वरतीच उलटत असल्याचे दिसून येते. जपानने दुसऱ्या महायुद्धात विमानातूनच अमेरिकेच्या पर्ल हार्बर या बंदरावर हल्ला केला होता. पुढे अमेरिकेने विमानातूनच ६ आणि ९ ऑगस्ट १९४५ रोजी जपानी शहरांवर हिरोशिमा आणि नागासाकीवर अणुबॉम्ब टाकले होते. विमानासारख्या गॅजेट्सचा वापर इतक्या निर्दयीपणे केल्याचे संपूर्ण मानव जातीला त्यावेळी पाहायला मिळाले. छोट्या मोठ्या गॅजेट्सचा वापर माणूस आपल्या हितासाठी करत असतानाच दुसऱ्याच्या हिताचाही त्याने विचार केला पाहिजे. आज कृत्रिम मानव म्हणजे 'रोबोट' आपल्याला स्पष्टपणे ओळखता येतो. परंतु पुढील काळात तो ओळखणे कठीण होईल व त्यामुळे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण होतील. त्यामध्ये बसवण्यात आलेल्या आर्टिफिशियल इंटलिजन्सीमुळे कायदा सुव्यवस्थेपासून ते मानवी संस्कृती, चालीरीती ,परंपरा व मानवी संबंध यावर प्रचंड प्रमाणात आघात होऊ शकेल. शेवटी भविष्यात देखील तोच प्रश्न उपस्थित होणार आहे तो म्हणजे 'गॅझेट्स माणसासाठी की माणूस गॅझेट्स साठी?'

**- किशोर जाधव, सोलापूर,**
**मो .नं.९९२२८८२५४१**

# अध्यापक विद्यालयाला शिक्षणाधिकारी खरे यांची भेट

**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.०२, मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी सुजाता खरे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर आर.सी. माहीम उर्दू अध्यापक विद्यालयाला नुकतीच भेट दिली. CTET /TET या परीक्षांबद्दल विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले

याबाबत सविस्तर वृत्त असे की बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी सुजाता खरे यांनी नुकतीच आर सी माहीम उर्दू या अध्यापक विद्यालयाला सदिच्छा भेट दिली. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त येथील भावी शिक्षक व प्राध्यापक यांनाही मराठी भाषेचे महत्त्व पटवून दिले. त्याचबरोबर स्पर्धात्मक जीवनामध्ये भविष्यात द्यावयाच्या सीटीईटी/ टीईटी या परीक्षांच्या बाबतीत विद्यार्थ्यांनी कशी पूर्वतयारी करावी याबद्दलही सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी त्यांचे समवेत उपशिक्षणाधिकारी आरती खेर उपस्थित होत्या. त्याचबरोबर विभाग निरीक्षक अलमास अफरोज याही उपस्थित होत्या.

प्रथम अध्यापक विद्यालयाचे प्राध्यापक पांडुरंग खरात यांनी स्वागत गीत गाऊन मान्यवरांचे स्वागत केले. आणि अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर खालिद सर यांनी प्रास्ताविक व मान्यवर पाहुण्यांची ओळख करून दिली. तज्ञ मार्गदर्शक वसीम अब्दुल सत्तार यांनी सीटीईटी व टीईटी या परीक्षांचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

यावेळी अध्यापक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या धाटणीचे गाणे सादर करून मान्यवर पाहुण्यांच्या समोर आपल्यातली कला प्रदर्शित केली.

या कार्यक्रमाला आरसी उर्दू अध्यापक विद्यालयातील सर्व स्टाफ व विद्यार्थी बहुसंख्येने हजर होते. शेवटी आयेशा कादरी यांनी मान्यवर पाहुण्यांचे आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता केली.

# दीड एकरात घेतले पंधरा क्विंटल गोदावरी तुरीचे उत्पादन...

**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.०२, मुखेड (नांदेड) :**

दीड एकरात गोदावरी वाणापासून पंधरा क्विंटल तर एकरी दहा क्विंटल पर्यंत उत्पादन घेतल्याची मुखेड तालुक्यातील गोजेगाव येथील शेतकरी रामदास माधवराव माळेगावे यांनी सांगितले. प्रति क्विंटल भाव सात हजार चारशे रुपये प्रमाणे खर्च वजा जाता एकरी ७४ हजार रुपये यांचे उत्पन्न मिळाले. इतर पिकांपेक्षा तुरीचे चांगले उत्पादन मिळाल्याने शेतकरी रामदास माळेगावे पाटील यांनी समाधान व्यक्त केले.



विद्यापीठाचे बागायती वाण गोदावरी तुरी बाबत माहिती घेत वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी कीटक शास्त्रज्ञ डॉक्टर पुरुषोत्तम झंवर साहेबांचे तालुका कृषी अधिकारी विकास नारनाळीकर साहेबांनी वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. व मंडळ अधिकारी गंभीरे, गोजेगावचे कृषी सहाय्यक साईनाथ कचकलवार यांच्या मार्गदर्शनाखाली रामदास माळेगावे पाटील या शेतकऱ्यांनी गोजेगाव ता. मुखेड या शिवारात लागवड केली होती.

**लागवड व व्यवस्थापन पद्धत**

बेड पद्धत करून त्यावर टोकन पद्धतीने लागवड केली होती. उगवणीनंतर दोन पेक्षा अधिक रोपे आली असल्यास त्या ठिकाणी विरळणी करणे, वेळोवेळी आंतरमशागत करणे, पाऊस पाणी चांगले असल्यास पिकाची उगवन क्षमता चांगली असते. लागवडीनंतर तुर पिक गुंडी अवस्थेत असताना पाच टक्के निंबोळी अर्क ची फवारणी करावी. फुलातून शेंगा अवस्थेत जाताना शेंगा पोखरणाऱ्या अळीचा बंदोबस्त होण्यासाठी इमामेटिंन बेंजोएटची फवारणी करावी. फवारणीनंतर कोमरा अवस्थेत एक ते दोन वेळा ठिंबक सिंचनाद्वारे पाणी दिल्यास योग्य व्यवस्थापन होते. तूर तयार होण्यासाठी जवळपास पाच ते सहा महिने कालावधी लागतो.

**शेतकऱ्यांनी तूर लागवड शेतीकडे वळावे**

तुर पिकाबरोबर अंतर पिकात सोयाबीनची पीक घेता येते गोदावरी तुर उत्पादन हे इतर पिकापेक्षा हमखास नफ्याचे पीक आहे परिसरातील व तालुक्यातील शेतकऱ्यांनी तुर लागवड शेतीकडे वळावे. असे आवाहन शेतकरी रामदास माळेगावे यांनी केली आहे.

# थोडक्यात

## डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान तर्फे वासिंद येथे स्वच्छता अभियान

**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.०१, शहापूर (ठाणे) :** स्वच्छतादूत पद्मश्री डॉ.श्री आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या व डॉ.श्री. सचिन दादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाने संपुर्ण भारतात व भारताबाहेर डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान तर्फे विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात. देशाने माझ्यासाठी काय केले, त्यापेक्षा मी माझ्या देशासाठी काय केले. या श्रीसमर्थ विचारातून श्रीसमर्थ बैठकांच्या माध्यमातून अधिक प्रभावी करण्याचे आणि त्याला सामाजिक परिवर्तनाचा आयाम देण्याचे काम पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी करत आहेत. दरवर्षी प्रमाणे यावर्षी वासिंद येथे स्वच्छता अभियान आयोजित करण्यात आले होते. यामध्ये वासिंद शहरामध्ये रस्त्यांच्या दुतर्फा साफ सफाई करुन ओला व सुका कचऱ्याचे संकलन करण्यात आले. या स्वच्छता अभियानात वासिंद परिसरातील श्री सदस्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता. आध्यात्म, शिक्षण, आरोग्य, समाजप्रबोधन या क्षेत्रात देश परदेशातील हजारो बैठकांच्या माध्यमातून लाखो श्री सदस्यांच्या मनात श्री समर्थ विचार शास्त्रशुद्ध पध्दतीने रूजवण्यात आदरणीय तिर्थरूप डॉ.आप्पासाहेब धर्माधिकारी व आदरणीय तिर्थरूप डॉ.सचिन दादा धर्माधिकारी यांनी संपादन केलेले आध्यात्मिक कार्यातील यश अलिकडच्या काळातील मोठ्या परिवर्तनाच्या यशस्वी चळवळीचे प्रत्यंतर देणारे असेच आहे. स्वच्छता अभियानात एकूण १०८६ सदस्यांनी सहभाग घेतला होता. तसेच उपस्थित मान्यवर राजेंद्र म्हसकर सरपंच वासिंद ग्रामपंचायत विलास पाटील, राजु भेरे, सदस्य सुधीर बेलवले, वासुदेव काठोले, संदीप पाटील, शरद दिवाणे सरपंच गेरसे ग्रामपंचायत, पत्रकार संजय भालेराव व पत्रकार काळुराम भोईर हे मान्यवर उपस्थित होते. चक्रधारी हॉटेल ते साईनाथ नगर, साईनाथ नगर ते पेट्रोल पंप, पेट्रोल पंप ते फूड मॉक्स हॉटेल, घोडविंदे नगर ते सूर्योदय चौक, मारुती मंदिर ते दहागाव रोड, पुजा स्विट्स ते ताडोबा मंदिर, साई नाथ नगर ते आंबेडकर चौक, नीतीश मेडिकल ते मारुती मंदीर, मुख्य नाका ते रेल्वे सर्कल, पैट्रोल पंप ते रेल्वे अंडर ब्रिज, रेल्वे अंडर ब्रिज ते पाटिल चौक, पाटिल चौक ते हनुमान कॉलनी रोड, हनुमान कॉलनी रोड ते गेरसे पूल, गडे दुकान ते गणेश घाट, जीजामाता रोड ते जि.प.शाळा, हनुमान कॉलनी ते स्मशानभूमी अश्या एकूण २० किलो मीटर रस्त्यांच्या दुतर्फा साफसफाई करण्यात आली. एकूण ओला कचरा ३ हजार ९०६ किलो व सुका कचरा ७ हजार ८८५ किलो साफसफाई करण्यात आली. सर्व गोळा केलेल्या कचर्याचे कासणे येथील डम्पींग ग्राऊड वर विल्हेवाट करण्यात आली. यामुळे वासिंद परिसरातून या सामाजिक कार्याचे कौतुक करण्यात येत आहे.

## डॉ.नानासाहेब धर्माधिकारी यांच्या वाढदिवसानिमित्त स्वच्छता अभियान



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.०१, डोंबिवली (ठाणे) :** डॉ. श्री.नानासाहेब धर्माधिकारी यांच्या वाढदिवसानिमित्त महापालिका आणि डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्या वतीने कल्याण डोंबिवली प्रभागामध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानात कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे व कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त आणि अतिरिक्त आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त अतुल पाटील (फ) प्रभागाचे सहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर स्वच्छता अधिकारी शरद पांढरे, उपमुख्य स्वच्छता अधिकारी ऑगस्टीन घुटे, जनसंपर्क अधिकारी पोफळे, स्वच्छता निरीक्षक प्रसाद पुजारे, दिलीप भोईर, प्रशांत गुंजाळ रोहिदास पाटील व महापालिकेचे सफाई कर्मचारी व प्रतिष्ठानचे सदस्य मोठे संख्येने उपस्थित होते. डोंबिवली पूर्व इंद्र चौक येथून स्वच्छता अभियानाला सुरुवात झाली. डोंबिवली संपूर्ण परिसरात रॅबिट माती कचरा वर्गीकरण करून उचलण्यात आला असून त्याची विल्हेवाट कल्याण डोंबिवली महानगरपालिका घनकचरा प्रकल्पावर करण्यात आली.

## भारताचा न्यूझीलंडवर रोमहर्षक विजय!



श्रेयस अय्यरची ७९ धावांची खेळी, वरूण चक्रवर्तीचे ५ विकेट्स व फिरकीपटूंची भेदक गोलंदाजी या जोरावर भारताने न्यूझीलंडला नमवत ४४ धावांनी मोठा विजय नोंदवला. भारताच्या फिरकीपटू चौकडीने ९ विकेट्स घेत किवीच्या धावांना वेसण घातलं. या विजयासह भारताने गुणतालिकेत पहिलं स्थान गाठलं आहे. टीम इंडिया चॅम्पियन्स ट्रॉफीत गट टप्प्यातील तिन्ही सामने जिंकत उपांत्य फेरीत पोहोचला आहे. यासह भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफीतील उपांत्य फेरीचा सामना ऑस्ट्रेलियाविरूद्ध खेळवला जाणार आहे.

दुबई इंटरनॅशनल स्टेडियमवर रविवारी २ मार्च रोजी खेळल्या गेलेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या शेवटच्या गट सामन्याकडे सर्वांच्या नजरा खिळल्या होत्या. उपांत्य फेरीतील ४ संघ आधीच ठरले होते पण आता कोणता संघ कोणत्या संघाविरूद्ध खेळणार हे निश्चित होणं बाकी होत आणि ते भारत-न्यूझीलंड सामन्याच्या निकालावर ठरणार होते. यासह आता उपांत्य फेरीचे संघ ठरले असून भारत वि. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड वि. दक्षिण आफ्रिका हे संघ असणार आहेत. भारताने चॅम्पियन्स ट्रॉफीतील तिसरी नाणेफेक गमावली पण सलग तिसरा सामना मात्र जिंकला आहे. नाणेफेक गमावत भारतीय संघ प्रथम फलंदाजीसाठी उतरला होता आणि भारताची सुरूवात खूपच खराब झाली. भारताने ३० धावांमध्ये ३ विकेट गमावले होते. यानंतर श्रेयस अय्यरने अक्षर पटेलच्या साथीने ९८ धावांची भागीदारी करत संघाचा डाव सावरला. श्रेयस अय्यरने ७९ धावांची तर अक्षर पटेलने ४२ धावांची खेळी केली. न्यूझीलंडकरून वेगवान गोलंदाज मॅट हेन्रीने ५ विकेट्स घेत भारताला जास्त धावा करण्याची संधी दिली नाही.

भारताने दिलेले २५० धावांचे लक्ष्य न्यूझीलंड सहज गाठेल असं वाटत होते. पण भारताने मोठी खेळी करत ४ फिरकीपटू खेळवले आणि किवी संघ फिरकीसमोर फेल ठरले. न्यूझीलंडचा फक्त केन विल्यमसन १२० चेंडूत ७ चौकारांसह ८१ धावा करत बाद झालाय याशिवाय कोणताही फलंदाज ३० धावांचा टप्पा गाठू शकला नाही. भारताच्या फिरकी गोलंदाजांनी किवी संघाला एकेका धावेसाठी मेहनत करायला लावली. अखेरीस भारताने न्यूझीलंडला सर्वबाद करत मोठा विजय नोंदवला.